भाग ४

# मूठभर गोष्टी



## औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

समग्र शिक्षा अभियान–शिक्षण विभाग

# संवाद...

महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांच्या सर्जनशीलतेला आवाहन करून त्यांच्यातील प्रतिभा कथारूप पुस्तकाच्या निमित्ताने आपल्यासमोर ठेवतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

कथा या विद्यार्थी व शिक्षकांचे भावविश्व उमलवू शकतात. कथा सांगताना शिक्षक व विद्यार्थी भेद विसरून एकाच भावनिक पातळीवर स्थिरावतात. आनंद, सुख, दुःख, भीती, त्याग, बंधुभाव, निष्ठा, प्रेम इ. भावना ते एकाचवेळी समरसून अनुभवतात. वर्गाध्यापनाच्या दृष्टीने आपला परंपरेने चालत आलेला हा ठेवा अतिशय महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांचा शब्दसाठा वाढवणे, वाक्यरचना शिकवणे, भावना व्यक्त करणे, श्रवण, संभाषण या कला विकसित करणे यासाठी कथा हे माध्यम मध्यवर्ती भूमिका बजावते.

सर्व शाळा प्रगत करणे व गुणवत्ता विकास करणे हे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. शिक्षकांमधल्या अंत:स्फूर्तीला, नवनिर्माणक्षमतेला नवे क्षितिज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच ज्या शिक्षकांच्या क्षमतेवर गुणवत्तेचा रथ ओढावयाचा आहे ती विकसित करणेही गरजेचे आहे. ही बाब ओळखून म.न.पा. आयुक्त, मा. डॉ. निपुण विनायक तसेच श्रीमती डॉ. निधी विनायक यांच्या प्रेरणेमधून 'मूठभर गोष्टी' हा कथासंग्रहाचा उपक्रम साकार होत आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेतून कथा लिहिल्या आहेत. शिक्षकदिनी या पुस्तकाचे विमोचन करून सर्व कथालेखक शिक्षकांचा सत्कार करत आहोत. हा आमचा पहिलाच उपक्रम असल्यामुळे आपण निदर्शनास आणून दिलेल्या सूचनांचे भविष्यात स्वागत राहील.

या कामी सहकार्य करणारे साहित्यिक श्रीमती डॉ. लीला शिंदे, प्रा. डॉ. दासू वैद्य, श्री. उद्धव भयवाळ, डॉ. विशाल तायडे, श्री. अबु बकर रहेबर, श्री. संजय कुलकर्णी यांचे विशेष आभार.

**श्रीकांत कुलकर्णी,**
शिक्षणाधिकारी
म.न.पा., औरंगाबाद


**प्रेरणा व संकल्पना**

**डॉ. निपुण विनायक,** (भा.प्र.से.)
आयुक्त, म.न.पा. औरंगाबाद
**डॉ. श्रीमती निधी विनायक**

**मुद्रक :**

**ड्रीम्स् प्रिंट ॲण्ड पॅक**
एम.आय.डी.सी. चिकलठाणा,
औरंगाबाद. मो. 8888888011

**प्रकाशक :**

**श्रीकांत कुलकर्णी**
शिक्षणाधिकारी,
म.न.पा. औरंगाबाद

**मुखपृष्ठ संकल्पना**

**श्री. ज्ञानेश्वर असोलकर**
(कलाशिक्षक)
**श्री. विनोद भोरे**
(कलाशिक्षक)

**विशेष साहाय्य :**

**ज्ञानदेव सांगळे**
स.का.अ.म.न.पा.
**संजीव सोनार** प्र.सां.अ.

**परीक्षक तथा मार्गदर्शक समिती**

श्रीमती डॉ. लीला शिंदे
प्रा. डॉ. दासू वैद्य
डॉ. विशाल तायडे
श्री. उद्धव भयवाळ
श्री. अबू बकर रहेबर
श्री. संजय कुलकर्णी

# मूठभर गोष्टी

## भाग ४

औरंगाबाद महानगरपालिका

शिक्षण विभाग

# अनुक्रमणिका


१. छोटीशी आशा ....................................................................१

२. अवनीची गोष्ट ....................................................................४

३. रंग हिरवा शाळेचा ....................................................................६

४. कचराकोंडी ....................................................................८

५. आनंदी डोंगर ....................................................................११

६. खरेपणाचे बक्षीस ....................................................................१२

७. मिशन – २०५० ....................................................................१४

८. गर्विष्ठ आंबा ....................................................................१६

९. परिस्थितीवर मात ....................................................................१८

१०. एका तळ्याच्या काठी ....................................................................२०

१२. गोडूची गोष्ट ....................................................................२१

१३. आरसा ....................................................................२३

१४. हुतात्मा ....................................................................२४

१५. छान किती दिसते फुलपाखरू! ....................................................................२७

# छोटीशी आशा

सन १९९३-९४ चा तो काळ असेल, जायकवाडी धरणाच्या परिसरात विजयपूर ते



अहमदनगर जिल्ह्यातील छोटेसे गाव होते. गावाभोवती धरणाच्या पाण्यामुळे मोसंबी, केळी, ऊस इत्यादी पिकांमुळे शेतशिवार हिरवेगार होते. या निसर्गाने नटलेल्या गावाची लोकसंख्याही जेमतेम होती आणि शाळाही इयत्ता चौथीपर्यंत होती.

गावातील लोकांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा खूप अभिमान होता. ती शाळा मुलांवर संस्कार घडविण्याचे आदर्श ठिकाण होते. विजयपूर गावातील दोन हुशार व मेहनती शिक्षक या शाळेत ज्ञान दानाचे कार्य करत. सगळे गाव त्यांना 'गुरुजी' या नावाने संबोधत. काळे गुरुजी इ. १ ली व इ. ४ थी च्या वर्गाला शिकवीत आणि जगदाळे गुरुजी इ. २ री व इ. ३ री च्या वर्गाला शिकवीत.

या गावाची छोटीशी टुमदार शाळा म्हणजे सिमेंटची. उतरत्या पत्र्यांचे सजवलेले व रंगरंगोटी केलेले दोन वर्ग. वर्गखोल्या बाहेर ओटा होता. त्यावरही आडवे पत्रे टाकलेले होते शेजारीच एक छोटी खोली अंगणवाडीसाठी होती. शाळेच्या एका कोपऱ्यात स्वच्छतागृह होते. शाळेला सभोवती मजबूत भिंत होती व दक्षिणेकडील दिशेला मोठं लोखंडी गेट होते. शाळेच्या वर्ग खोल्याभोवती पाच ते सहा डेरेदार गुलमोहराची झाड असायची. विविध पक्ष्यांत ही झाडे गजबलेली असायची. शाळेतील मुलांना गुलमोहराची फुले खायला मज्ञा यायची, मुलं गुलमोहराच्या शेंगांचा खुळखुळा करायचे, तलवार खेळायचे, बियांचे चापपाणी हे मजेशीर खेळ खेळायचे. शाळेच्या मैदानातील वाळूत पाय घालून घरे बनवून त्यावर कागदाचे झेंडे लावायचे. अशी आनंददायी शाळा खूपच सुंदर होती.

इयत्ता पहिलीतील संध्याला गाव व शाळा खूप आवडत. संध्या दोन वर्षांची असल्यापासून या गावात आईवडिलांपासून दूर आजी आजोबांजवळ राहत होती. सर्व मामा,

मावशी व आजी–आजोबांची ती लाडकी होती.




संध्या खूपच आनंदात व एक प्रकारच्या गुर्मीत होती. कारण बालवर्गाचे शिक्षण होऊन ती आता इयत्ता पहिलीमध्ये आली होती. तिचे लाडके आजोबा म्हणजे आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त काळे गुरुजी तिला शिकवणार होते. दिवसभर आता तिला आजोबाच्या सानिध्यात राहता येणार होते. जेव्हा संध्याने पहिलीच्या वर्गात प्रवेश केला तेव्हा तिला समजले की घरी लाड करणारे आजोबा शाळेत शिक्षक म्हणून शिस्तप्रिय, तडफदार व अध्ययनप्रिय आहेत. गावातही लोक त्यांना आदर्श म्हणून मान देतात.

वर्गात काळे गुरुजीचे फळ्यावरील आखीव रेखीव मोत्यासारखे अक्षर बघून लहानगी संध्या पाटीवर अक्षरे गिरवू लागली. अंक, बाराखडीच्या आवाजाने वर्ग दुमदुमून जाऊ लागला. गुरुजींच्या गोड आवाजातील कवितेमुळे मुले रंगून जायची. शाळेचा परिपाठ दोन्ही शिक्षक पेटीच्या सुरासह घ्यायचे, त्यामुळे संध्या वेळेआधीच शाळेत हजर राहायची; पण आपले आजोबा या शाळेचे शिक्षक आहे या अभिमानामुळे संध्या शाळेतील मुलांना धाक दाखवून शेतातील चिंचा, बोरे आणायला लावायची. काळे गुरुजी वर्गातील मुलांना गोंधळ घालणाच्या मुलांची नावे फळ्यावर लिहायला सांगून शाळेच्या ओट्यावर लिखाणकाम पूर्ण करायचे तेव्हा छोटी संध्या शिसपेन्सिलिची लालूच देऊन व धाक दाखवून, खोड्या करुनही फळ्यावरील स्वत:चे नाव मिटवायला लावायची. काळे गुरुजीचे नातीवर बारीक लक्ष असायचे त्यांना आपली नात अभ्यासात पुढे जावी असे नेहमी वाटायचे. त्यामुळे दररोज संध्याकाळी घराच्या ओट्यावर बसून शाळेतील घडलेल्या गोष्टीची उजळणी घ्यायचे. तिला चांगल्या हिताच्या गोष्टी सांगायचे.

असेच पहिलीचे वर्ष संपत आले होते. काळे गुरुजी दोन्ही वर्गाचे अध्यापन सुंदरपणे करत होते. एका वर्गाला अभ्यास देऊन दुसऱ्या वर्गाला शिकवायचे. गुरुजींच्या प्रेमळ व सोप्या भाषेमुळे अवघड विषय सोपे होऊन जायचे. त्यामुळे गुरुजी मोठ्या वर्गाला शिकवीत असताना संध्या लक्ष देऊन ऐकत बसायची. तिला मोठ्या वर्गाचाही अभ्यास गुरुजींमुळे

सुलभ वाटू लागला.

एकदा गुणवत्ता तपासणी साठी मोठे अधिकारी शाळेत आले होते. अधिकाऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे पहिलीच्या वर्गाने दिली नंतर चौथीच्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायला सुरुवात केली. त्यातल्या एका साहेबांनी फळ्यावर चंद्र, पृथ्वी व सूर्य यांच्या आकृत्या काढल्या आणि विचारले, सांगा मुलांनो हे कोणते ग्रहण हो ? चंद्रग्रहण की सूर्यग्रहण ? इयत्ता ४ थी चा एक विद्यार्थी म्हणाला सर हे चंद्रग्रहण आहे दुसरा म्हणाला, सर हे सूर्यग्रहण आहे, अशी बऱ्याच विद्यार्थ्यांनी उत्तरे दिली; परंतु साहेबांना अपेक्षित असलेले उत्तर दुसरेच होते. जेव्हा इयत्ता पहिलीतील संध्याने हात वर केला तेव्हा काळे गुरुजींनी तिच्याकडे बघितले ते साहेब म्हणाले, ''सांग बेटा, तुझे उत्तर'' तेव्हा संध्या म्हणाली, फळ्यावरील आकृत्या बघता कोणतेच ग्रहण होऊ शकत नाही कारण, सूर्य, चंद्र व पृथ्वी हे एका सरळ रेषेत नाही. ग्रहण होण्यासाठी सूर्य, चंद्र व पृथ्वी एका सरळ रेषेत आले पाहिजे असे आमच्या गुरुजींनी शिकवले आहे.

संध्याचे उत्तर ऐकून अधिकारी खूश झाले. त्यांनी तिला पाटी पेन्सिल बक्षीस देऊन शाबासकी दिली. तेव्हा काळे गुरुजींच्या डोळ्यात आनंद मावत नव्हता. त्यांनी त्यांच्या गोड नातीची ओळख करून दिली. त्यावेळी अधिकारी म्हणाले, ''गुरुजी, तुमच्यासारखे शिक्षक विद्यार्थ्यांना लाभले हे विद्यार्थी खूप नशिबवान आहेत. या विद्यार्थ्यांचे भविष्य खूप चांगले होणार आणि हो ही संध्या मोठेपणी तुमचे नाव नक्कीच मोठे करणार!''

त्या दिवसाच्या संध्याकाळी ओट्यावर बसून नातीला प्रेमाने मांडीवर घेऊन एक गोड पापा आजोबांनी घेतला ती खुदकन हसली. आजोबाच्या गळ्याला मिठी मारुन म्हणाली, आण्णा मी मोठेपणी तुमच्यासारखी शिक्षक होणार आणि तुमचा आदर्श पुढे नेणार? ''अण्णा, मला तुम्ही खूप आवडता'' असे म्हणून संध्याने आजोबांचा गोड पापा घेऊन आपली मिठी अधिकच घट्ट केली!

**नंदा राम गटकळ (स.शि.)**

म.न.पा.कें.मा.वि. बन्सीलालनगर, औरंगाबाद.

# अवनीची गोष्ट

अवनी शाळेतून घरी आली. हात पाय स्वच्छ धुऊन तिच्या वडिलांजवळ बसली. आईने तिला दूध दिले. अवनीचे वडील अवनीच्या आईला म्हणाले, ''मी थोड्या कामानिमित बाहेर जाऊन येतो.'' अहो, येताना ना थोडा भाजीपाला घेऊन या संध्याकाळी पालक पनीर करते अवनीला खूप आवडते. ठीक आहे. अवनीचे वडील म्हणाले, ''थांबा थोडे कापडी पिशवी आणते'' अवनी च्या आईने सांगितले, 'राहू दे ग कॅरी बॅग देतात ते. अवनी दूध पिता पिता सर्व ऐकत होती. तिने दुधाचा ग्लास लवकर संपवला.

ती तिच्या वडिलांना म्हणाली, ''तसे नाही पप्पा. आमच्या बाईंनी त्यांच्या तासिकेत सांगितले होते की, महाराष्ट्र सरकार ने आता प्लास्टिक वर बंदी आणली असून ५० मायक्रोनच्या खाली असलेली प्लास्टिक ची कॅरी बॅग वापरताना दिसले तर पहिल्या गुन्ह्यासाठी ५०००, दुसऱ्या गुन्ह्यासाठी १०००० तर तिसऱ्या गुन्ह्यासाठी २५००० रुपयांचा दंड होऊ शकतो. आता जेवणासाठी वापरल्या जाणाऱ्या युज ॲण्ड थ्रो वस्तू जसे चमचे ,वाट्या, ग्लास प्लेट या वस्तूंवरदेखील सरकारची बंदी आहे. त्यामुळे पप्पा तुम्ही कापडी पिशवी-पासून सर्व प्लास्टिकच्या वस्तू वापरणार नाही. ''हो ना माझी छकुली, अवनीचे वडील अवनीला म्हणाले. ''आत जा आणि कापडी पिशवी घेऊन ये''






अवनीने पुढे सांगितले की, ''आपण जे प्लास्टिक वापरतो ते बाहेर फेकल्यावर नाल्यात जाऊन अडकते आणि पावसाळ्यात त्यातून पाण्याचा निचरा होत नाही. लोकांच्या घरात पाणी शिरते. तसेच डास वाढतात. वेगवेगळ्या आजारांचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे आपण प्लास्टिकचा वापर टाळला पाहिजे. प्लास्टिकच्या पिशवीत आपण उरलेले अन्न , उरलेला भाजीपाला बाहेर फेकला की गाई, वेगवेगळी जनावरे

प्लास्टिकच्या बॅगासह खातात. प्लास्टिक तसेच त्यांच्या पोटात साठून राहते. त्यामुळे त्यांचा मृत्यू होतो.

पर्यावरणाला वाचविण्यासाठी आपण प्लास्टिकचा वापर टाळला पाहिजे. आणि हो पप्पा मी माझ्या शाळेच्या डब्यालादेखील प्लास्टिकची कॅरीबॅग लावणार नाही. त्या ऐवजी आईलाच सांगणार आहे भाजीत कमी तेल टाक म्हणून. अवनीची आई कापडी पिशवी घेऊन आली. सर्वांनी मिळवून ठरवले की आपली पृथ्वी, पर्यावरण वाचविण्यासाठी आपण प्लास्टिकचा वापर टाळू. अवनीचे वडील कापडी पिशवी घेऊन बाहेर गेले.

**तुषार संपत ताठे (स.शि.)**

म.न.पा. प्रा.शा.नवीन वसाहत हर्सूल, औरंगाबाद.



# रंग हिरवा शाळेचा



उन्हाळ्याच्या सुट्ट्यांना राम-राम ठोकत मुले शाळेत आली. दीर्घ उन्हाळी सुट्टी व पडणाऱ्या पावसाच्या सरीबरोबर मनावर आलेले मळभही वाहून गेले होते. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शिक्षक-विद्यार्थी यांच्यात नवचैतन्य निर्माण झाले होते. शिक्षक-विद्यार्थी यांनी मिळून शाळा हिरवीगार करायचे ठरविले होते. त्यासाठीचे नियोजन कागदावर सुरु झाले होते. वृक्षारोपणासाठी कोणती रोपे आणायची, ती कशी वाढवायची, त्याची काळजी कशा पद्धतीने घ्यायची ते ठरविले होते.

शाळेच्या पटांगणात असलेली जागा समप्रमाणात सर्व वर्गांना वाटली होती. आपल्याला मिळालेल्या जागेवर वर्गाची पाटी लागली होती. यात दोन गट केले होते. १ ली व २ री या गटांतील विद्यार्थ्यांनी गुलाब, झेंडू, सदाफुली, मोगरा, जाई-जुई अशी फुले लावली होती. त्याचा उपयोग शाळेत साजऱ्या होणाऱ्या जयंती, पुण्यतिथी याप्रसंगी पुष्पहार तयार करण्यासाठी होत होता. शाळेत आलेल्या अतिथीगणांचे स्वागत करण्यासाठी पुष्पगुच्छही याच फुलांनी बनविल्या जात होते.

दुसरा गट होता ३ री ते ५ वीचा, या गटांतील विद्यार्थ्यांनी वांगी, मिरच्या, टमाटे, भेंडी, पालक या प्रकारच्या फळभाज्या व पालेभाज्या लावल्या होत्या. आपआपल्या वर्गाच्या रोपाची विद्यार्थी जीवापाड काळजी घेत होते. बालवाडीलाही या उपक्रमात सहभागी व्हावे वाटले पण या चिमुकल्यांना आपला कोपरा नीट सांभाळता येईल का ? हा सर्वांना पडलेला प्रश्न होता. यातूनच एक कल्पना बाईंना सुचली. हरळीने वाढलेला एक कोपरा बालवाडीला दिला. बालवाडीची मुले हरळीने वाढलेल्या कोपऱ्याची स्वच्छता ठेवू लागली. हरळ अजून चांगली वाढावी यासाठी त्यावर पाण्याचे फवारे मारू लागले होते. श्रावण महिन्यात

हिरव्यागार दिसणाऱ्या हरळीच्या दुर्वा भाद्रपद महिन्यात गणपतीसमोर ठेवतात. बालवाडीतील प्रत्येक विद्यार्थी दररोज ११ व २१ दूर्वांच्या प्रत्येकी दोन जुड्या बनवत होता. यातून अगदी सहज सप्टेंबर महिन्यापर्यंत साधारण २० पर्यंत उजळणी मुले आनंदाने शिकत होती.



सर्व शिक्षकांनी मिळून त्यांना मिळालेल्या कोपऱ्यात भरपूर तुळशीची झाडे लावली होती. तुळशीचे झाड औषधी गुणधर्म असलेले आहे. माणसाला जगण्यासाठी आवश्यक असणारा ऑक्सिजन देण्याचे काम तुळस रात्रंदिवस करते. या कोपऱ्याला 'ऑक्सिजन पार्क' असे नाव दिले होते. शाळा अगदी हिरवीगार झालीहोती. शाळेत प्रवेश करतानाच प्रसन्न वाटत होते. झाडांवर फुलपाखरे, पक्षी गाणे गात होती. जणूकाही वर्गात विद्यार्थ्यांची तर वर्गाबाहेर पाखरांची शाळा भरल्याचा भास होत होता.

सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यासाठी आलेल्या पालकांना निवेदक या हिरव्यागार बागेबद्दल सांगत होता. कार्यक्रम संपल्यानंतर शाळेत भरलेल्या बाजाराला भेट देण्याचे आवाहन निवेदकाने पालकांना केले होते. प्रत्येक वर्गाने फळभाजी, पालेभाजी विविधरंगी फुले याची एक एक टोपली विकण्यासाठी ठेवली होती. त्यांच्याजवळ तराजू व माप ही होते. पालकांनी त्या चिमुकल्यांच्या बाजाराला भेट देऊन वस्तू खरेदी केल्या . त्यातून येणारा अनुभव सर्वांनाच आगळा वेगळा आनंद देणारा होता. प्रत्येक वर्गाच्या प्रतिनिधीकडे काही पैसे जमा झाले होते. मिळालेल्या पैशातून मुले, गरजू, होतकरू मित्राला शैक्षणिक मदत करत होती.

**वैशाली पंडितराव गुळवे (स.शि.)**

म.न.पा., एकनाथनगर, औरंगाबाद.

# कचराकोंडी



आईची भाजीवालीशी चाललेली घासाघीस ऐकूनच आज पहाटे जाग आली. माझं ना असच होतं. सुट्टीच्या दिवशी आपसूकच जाग येते अन् शाळेच्या दिवशी डोळा उघडत नाही. आई लगबगीने घरात आली, घाईघाईने तिने आपली कामे यंत्रापेक्षाही चांगली आणि जलद रीतीने आटोपण्यास सुरुवात केली.

''दीदी, उठलीस का गं ?'' आई म्हणाली. उगाचच झोपेचं सोंग घेत मी अंथरुणातच रेंगाळत राहिले. भैय्याने आणलेला पेपर तिने सहज उघडून बघितला. काय हे आज पाच दिवस झाले. कचराकोंडीला इतका का हा कचरा साचतो ? जागाच नाही का कचरा टाकायला ? कचऱ्याचे डोंगर म्हणजे काय ? बापरे ! किती प्रश्न ? प्रश्नांची अशी सरबत्ती डोक्यात घेऊनच झोपेतून उठले. आईला मीठी मारली, आई म्हणाली, ''जा माझी बाई, तोंड धुऊन ये, चहा देते तुला'' चहा. काल तर मॅडम म्हणाल्या लहान मुलांनी दूध प्यावे पणं.. माझी एकटी आई काय काय करणार ? गेल्या आठ-दहा महिन्यांत तर तिच्या कामाला जणू भर आला होता. दादाची ट्यूशन फी भरायची होती ना.

कचराकोंडी, कचराकोंडी या शब्दांनी जणू डोक्याचा कचराच झाला होता. आई केव्हाच कामाला निघून गेली होती.

''भैय्या, मी जाऊन येते सविताकडे''.

''जा, पण लवकर परत ये,'' दादा काळजीच्या स्वरात म्हणाला.

सविताकडे जाऊन पटकन गृहपाठाची वही घेऊन तबस्सुमकडे ही चक्कर माण्याचा बेत मी ठरवला. तब्बसुम नुकतीच याच वर्षी आमच्या शाळेत दाखल झाली होती. इंदोरवरुन आली होती. तिच्या शहराने म्हणे स्वच्छतेच्या बाबतीत पहिला क्रमांक पटकावला होता. मग तिकडचे लोक कचरा करत नाहीत का ? पुन्हा कचऱ्याविषयी माझ्या डोक्यात विचार सुरू झाला.

''काय हो ताई, आमच्या दारात कचरा फेकू नका ना. कचऱ्याची गाडी येईलच की




आता.'' शिंदे काकांना बोलताना मी ऐकलं. ''मला नाही ना दादा, इतका वेळ कचऱ्याची गाडीची वाट पहायला.'' असं म्हणून नरवडे काकूंनी कचरा नालीतच फेकला.

मला उशीर होत होता. मी चालण्याचा वेग वाढवला. बस, एक वळण आणि आलचं की सविताचं घर म्हणून घाईघाईने निघाले. वळणावरच कचऱ्याचा ढीग यालाच म्हणतात का, कचऱ्याचा डोंगर ?

शीतल, शीतल म्हणून कोणीतरी मला आवाज देत होते. जरा कचऱ्यावरुन समोर पाहिलं तर सविता दिसली. ''बरं झालं, भेटलीस गं, मी तुझ्याकडेच येत होते. मी म्हणाले, ''चल मला विज्ञानाची गृहपाठाची वही दे बरं.'' ''चल घरी,'' म्हणून सविताने हात धरूनच घरी नेलं. सविताच्या घरात शिरणार तोच तिची आई दारातच कचरा जाळताना दिसली.

''सविता, कचरा जाळू नकोस, म्हणून सांगत जा ना आईला,'' घरात शिरता शिरताच मी म्हणाले, ''अगं हो, मी किती वेळा सांगितलं. पण...'' सविता हताशपणे बोलली.

गृहपाठाची वही घेऊन मी तबस्सुमकडे निघाले. आज मनात तर प्रश्नाचं काहूरचं माजलं होतं. पण सराचं वाक्य आठवले. आपल्याभोवती जे काही चालले आहे. त्याबद्दल मनात काहूर माजणे स्वाभाविक आहे, मग अशा खोल डोहात गटांगळ्या खाण्यापेक्षा या प्रश्नांची उत्तरे शोधायला हवीत. हा विचार घेऊनच तब्बस्सूमच्या घराच्या दारात पोहोचले. ''तबस्सूम, तबस्सूम'' मी म्हणाले. ''अगं, आज इकडे कशी.''

''सविताकडे आले होते, म्हटलं तुलाही भेटून जावं.''

''ये, ना दारात का उभी ?''

गेटमधून आत शिरताच तबस्सूचं अंगण कसं स्वच्छ दिसलं. दारात दोन डस्टबीन होत्या.

''तबस्सूम तुम्ही दोन डस्टबीन वापरता ?''

''अगं हो, एक सुका कचरा आणि दुसरी ओल्या कचऱ्यासाठी.''

''कचरा, कोठे ओला, सुका असा असतो का ?'' मी हसतच म्हणाले.

''कचरा, तो, कचराच ना ?''

''अगं वेडा बाई, कचऱ्याचे ही वेगवेगळे प्रकार होतात. ओला कचरा म्हणजे भाजीपाल्याची देठ, खरकटे अन्न इ. सुका कचरा म्हणजे कागद, चॉकलेटचे रॅपर, प्लॅस्टीक इ.'' आणि म्हणूनच यासाठी या दोन डस्टबीन.''

मी या सर्व गोष्टींचा विचार करतच होते की, तबस्सुम म्हणाली, ''अगं मी इंदोरला होते ना तेव्हा आमच्या वार्डात येणारी कचरागाडी. ओला आणि सुका कचरा असल्याशिवाय कचराच घेत नव्हती. म्हणूनच तर झाली इंदोर सिटी स्वच्छतेत नंबर वन.''

आता कुठे मनातील विचारांचे आभाळ जरा मोकळं झालं. मग ह्या गोळा केलेल्या ओल्या, सुक्या कचऱ्याचं पुढे काय ? हेच प्रश्न डोक्यात गोधंळ घालत असतानाच मी तबस्सुमचा निरोप घेतला. आणखी नवीन प्रश्नांची गर्दी माझ्या मनात होती त्यांची उत्तरे मला शोधायची आहेत.

**अनिता पाटील**

म.न.पा. प्रा.शा. नारेगाव, औरंगाबाद.



# आनंदी डोंगर



एक खूप मोठा डोंगर होता. त्या डोंगरावर खूप मोठ-मोठी झाडे होती. वेली होत्या, झुडपे होती. रंगबेरंगी फुलांची झाडे होती. आणि योगायोगाने त्या वर्षी पाऊसपण खूप पडला होता. त्यामुळे डोंगर अगदी फुलून आले होते. जिकडे-तिकडे हिरवी हिरवी गार झाडे दिसत होती. वेली झुडुपे हिरवी झाली होती. झाडे फुलांनी बहरली होती. काही झाडांना रानफळे लागली होती. झाडे, करवंदे, बोरे, टेंभरे, कौट, चिंच डोंगरातून छोटासा ओढासुद्धा वाहत होता. आणि त्यामुळे डोंगरातील पशु-पक्षी खूप आनंदी होते. इकडून तिकडे बागडत होते. सर्वांना खायला फळे व पशूंना झाडपाला होता. प्यायला पाणी होते. त्यामुळे ते सर्व खूप-खूप आनंदी होते. शेजारच्या गावातील लोक गाई-गुरे चारायला घेऊन डोंगरावर येत असत. गाई-गुरांनाही भरपूर गवत व चारा पाला मिळत असे. सर्व खूप आनंदी होते. त्यामुळे तो डोंगर खूप समाधानी होता.

परंतु,काही दिवसांनी काय झाले की गुराखी गाय-बैल चारायला डोंगरावर येऊ लागले. आणि त्यांनी हळूहळू झाडे तोडायला सुरुवात केली. आणि असे करता करता डोंगरावरील झाडे कमी-कमी होत गेली. हिरवागार दिसणारा डोंगर भकास व उजाड दिसायला लागला. डोंगरावर पाऊस पडणेही बंद झाले. मग सर्व पशू-पक्षी यांची उपासमार होऊ लागली. त्यांना खायला, प्यायला मिळेना. सर्व त्रस्त झाले. इकडे तिकडे सैरावैरा धावू लागले. त्यांची उपासमार होऊ लागली. हे सर्व पाहून डोंगर खूप दु:खी झाला. आणि हे सर्व पाहून त्या गुराख्यांनाही कळाले. त्यांच्याही लक्षात आले की आपण झाडांची कत्तल केल्यामुळे डोंगर उजाड झाला आहे व सर्व पशु-पक्षी हैराण झाले आहे. त्यांना त्यांची चूक कळली. आणि त्यांनी डोंगरावर झाडे लवण्याची शपथ घेतली व खूप झाडे लावली. आणि योगायोगाने पाऊसही छान झाला. त्यामुळे झाडांची वाढ छान झाली व डोंगर पुन्हा हिरवागार दिसू लागला. पुन्हा पशु-पक्षी आनंदी झाले आणि डोंगर पुन्हा आनंदी झाला.

**तायडे मंगला (स.शि.)**

म.न.पा. के.प्रा.शा. सिडको, एन-७, औरंगाबाद.



# खरेपणाचे बक्षीस

धीरज व सचिन नावाचे दोघे जिवलग मित्र होते. दोघेही हुशार, चंचल, चतुर. दोघेही एकाच शाळेत व एकाच वर्गात होते. फरक होता फक्त त्यांच्या हुशारी वापरण्याचा.

दोघांची घरेही जवळ-जवळ होती. ते नेहमी सोबत अभ्यास करायचे, खेळायचे, धीरजची आई नेहमी धीरजला चांगल्या गोष्टी सांगायची. चांगले संस्कार रुजवायची. सचिन बऱ्याचदा खोटे बोलायचा. दुसऱ्यांची मजा घ्यायचा. इतरांची फजिती करायचा. आणि धीरजला मात्र हे आवडायचे नाही तो नेहमी सचिनला खरे बोलत जा, खोटे बोलू नका असे सांगत असे. परंतु सचिन कुणाचंच ऐकायचा नाही.

एकदा दोघेही बागेत खेळायला गेले होते. ते खेळत असताना तेथे दोन माणसं जोरात पळत आली व इकडे-तिकडे लपण्यासाठी जागा शोधू लागली. ह्या सगळ्या हालचाली सचिन व धीरज दोघेही निरखून बघत होती. त्या दोन्ही माणसांजवळ बॅग होत्या व बॅगमध्ये काही तरी सामान होते. व ते लपत आहेत. हे दोघांच्या लक्षात आले. ते दोघे विचारत असतानाच तेथे दोन पोलीस आले. त्या दोन व्यक्तींचा पाठलाग करत पोहोचले. त्यांनी सचिनला विचारले, ''तू इथे कुणाला पळतांना पाहिले का ?'' तेव्हा सचिनने स्वभावानुसार ''नाही, कुणाला बघितले नाही?' असे म्हणाला, परंतु जेव्हा धीरजने पाहिले की, पोलीस काका काही तरी विचारताहेत तर त्याने लगेच तेथे जाऊन पोलिसांना विचारले, 'काका, काय झालं ?'' तेव्हा पोलिसांनी धीरजलाही तोच प्रश्न





विचारला, तेव्हा धीरजने पटकन ते दोघे जिथे लपली ती जागा पोलिसांना दाखवली.

पोलिसांनी पटकन त्या दोघांना पकडून घेतले. ते दोघे दुसरे, तिसरे कुणी नसून चोर होते. व दागिने चोरून पळत होते. परंतु धीरजच्या हुशारीमुळे ते चोर पकडले गेले.

पोलिसांनी धीरजला पारितोषिक दिले व त्याचा सत्कार व कौतुक केले. नंतर सचिनला वाईट वाटले की, आज आपण जर खरं बोललो असतो तर आपल्यालाही बक्षीस मिळाले असते व आपलाही सत्कार झाला असता. अशा पद्धतीने सचिनलला त्याची चूक समजली व त्याने ठरविले की, यानंतर कधीच खोटं बोलणार नाही व कुणाची चेष्टा मस्करी करणार नाही. नेहमी खरे बोलेन.

**दीपाली औटे (स.शि.)**

म.न.पा.मा.वि. सिडको, एन–७, औरंगाबाद.

# मिशन – २०५०



''अरे ! अरे ! नोझूका कुठे चाललास?, बाळा अरे थांब, थांब एकटा नको जाऊ न तू अजून लहान आहेस'' असे सिझूका आपल्या मूलास सांगते.

नोझूका – ''आई, अग! मला आजोळी जायचंय, कसे आहे आजोळ? ते बघायचंय.

सिझूका –''अरे, पण तू एकटा नको जाऊस, थांब मी बाबांना बोलावते.''

सिझूका – ''नोबिता, अरे नोबिता, चल चल माझ्या बरोबर तुझे काम नंतर कर.''

नोबिता – ''अगं कुठे ?''

सिझूका – ''अरे, नोझूकाला त्याचे आजोळ बघायचे. असा हट्टच धरला त्याने.''

नोबिता – ''अरे बाळा थांब, चल मी आणि आईपण येतोय तुझ्यासोबत.''

सर्व जण डोरेमॉनच्या गॅझेटमध्ये बसून पृथ्वीवर यायला निघतात. गॅझेटमध्ये बसल्यावर त्यांना लांबून पृथ्वीचा गोल दिसतो. नोबिता पृथ्वीची गोष्ट सांगायला सुरुवात करतो.

खूप–खूप वर्षांपूर्वी पृथ्वी म्हणजेच वसुंधरा ही खूप संपन्न होती. तिच्यावर झाडे, वेली, पशू–पक्षी, मानव, डोंगर, दऱ्या खूप होती, मोठे – मोठे समुद्र, नद्या, तलाव सगळीकडे हिरवेगार, निळेनिळे दिसायचे.

पण काय ? मानवाने स्वत:चाच घात करून घेतला, नवनवीन शोध लावले, स्वत:चा विकास खूप –खूप केला, मानव अंतराळात फिरून मंगळ, चंद्र, सूर्य यांचा शोध घेऊ लागला. जेवढा मानव प्रगत होत गेला, तसतशी वसुंधरा खालावत चालली.

मानवाने पृथ्वीचा, तिच पर्यावरणाचा विचार कधी केलाच नाही.

बेसुमार जंगले तोडली, पाण्याचा खूप अपव्यय केला. सगळीकडे प्रदूषणाचा त्याने कहरच मांडला. वायूचे, ध्वनीचे, पाण्याचे, पर्यावरणाचे प्रदूषण खूप-खूप झाले.

त्याचा परिणाम म्हणून पृथ्वीचा संरक्षणकर्ता ओझोनचा स्तर कमी कमी होत गेला. त्यामुळे पृथ्वीवर उष्णता वाढली. बेसुमार जंगल तोडीमुळे पाऊ स कमी झाला. त्यामुळे पाण्याची कमतरता भासू लागली. जेवढा मानव प्रगत झाला, त्याचा त्याने फायदा करून न घेता नुकसानच करून घेतले. त्याने जर झाडे लावली असती, स्वच्छता ठेवली असती, प्लास्टिक वापरले नसते व पाणी जपून वापरले असते तर ही वेळ पृथ्वीवर कधीच आली नसती. मानव पृथ्वीवर आजही सुखाने नांदला असता.

नोबिता - ''अरे बघ - बघ आलो, आपण तुझ्या आजोळी, पण बघ, काहीच नाही आता पृथ्वीवर. सगळीकडे कोरडी जागा. एकही झाड दिसत नाही, आणि आपण खाली उतरायचे कसे? पृथ्वीवरचा ऑक्सिजनच संपलाय.''

सिझूका - ''बाबा - आई मी आणि माझे मित्र एकदा लवकरच पृथ्वीवर येऊ आणि आम्ही आमचे आजोळ पुन्हा पूर्वीसारखे करण्याचा प्रयत्न करू, आणि ते परत जातात''. बालमित्रांनो तुम्ही रोज कार्टून बघता तुम्हाला जर आपली पृथ्वी वाचावी, तिचे नुकसान होऊ नये असे वाटते अस तर आपण आजच सर्वजण एक शपथ घेऊ

मी सगळीकडे खूप-खूप झाडे लावीन. मी प्लॉस्टिक वापरणार नाही, मी जास्तीत जास्त सायकलवर फिरेन होणारे प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न करीन. आणि आपण कार्टून बघणे कमी करून आपली पृथ्वी आपणच वाचवू आणि

वसुधैव कुटुम्बकम्..!

हा श्लोक सार्थ करू. आणि आपण झाड लावू आणि जगवू!

**उर्मिला लोहार (स.शि.)**
म.न.पा. के.मु.अ.कें.मा.वि. मुकुंदवाडी, औरंगाबाद.

# गर्विष्ठ आंबा

रविवारचा आठवडी बाजार भरला होता. सलीमचाचाच्या दुकानात सगळी फळांची नेते मंडळी अगदी ठेवणीतले कपडे घालून बसलेली होती. लालगर्द कॉलरचा कोट घातलेले डाळींबभाऊ मोठमोठ्या गोष्टी सांगत होते. रेनकोट घालून द्राक्षेभाऊंचे पाणीदार कुटुंब दाटीवाटीने पाटीत बसले होते. वय झाल्याने पिकून तपकिरी झालेला चिकूभाऊ टेकून बसला होता. नुकतीच मोठी झालेली केळीताई आपली नवीकोरी पिवळीधमक साडी घालून मैत्रिणींसोबत खिदळत बसली होती. सगळीकडे एकच गलका चालू होता. तेवढ्यात गाडीवरच्या मोठ्या कॅरेटमधले सफरचंद भटजी आपली शेंडी सांभाळत हळूच बाहेर डोकावले, ''अरे स्वस्तातल्या फळांनो । जरा आवाज कमी करा'' असे भटजींनी सगळ्यांना दरडावून सांगितले. शेजारचा पेरू सफरचंदाच्या कानात मीठ-मिरची लावून काहीतरी सांगत होता.



तेवढ्यात मोठ्या टोपलीतून पिवळे, चमकदार, रसरशीत पण रागाने लाल झालेले आंबेराव बाहेर आले. महागडे राजे झाल्यापासून आंबेराव जरा जास्तच भाव खायला लागले होते. बाकीच्यांनादेखील त्यांचा हेवा वाटायला लागला होता. त्याचवेळी चिंटूचे बाबा पिशवी घेऊन आले. त्यांनी द्राक्षे, चिकू , सफरचंद, केळी व आंबेराव सगळ्यांना विकत घेतले आणि पिशवीत कोंबून घरी आणले. घरी आल्यावर त्यांनी पिशवी चिंटूच्या आईला दिली.

चिंटूच्या आईने सर्व फळांना बाहेर काढून बेसीनच्या नळाखाली चांगली रगडून आंघोळ घातली, आणि टेबलवर ठेवून दिले. सगळे बिचारे नाकातोंडात पाणि गेल्याने घाबरून बसले होते. आंबेराव मात्र सगळ्यांची गंमत पाहत बसला होता. फळांच्या राजा झाल्यापासून तो मोठा तोरा गाजवत गर्वाने छाती फुगवून बसला होता. तेवढ्यात चिंटूची आई आली आणि टेबलवरच्या सगळ्या फळांना चाकूने बारीक कापून काचेच्या सुंदर वाटीत ठेवून गेली. सगळे

बिचारे त्या काचेच्या वाटीत फ्रूट सॅलड बनून निपचित पडले होते. सगळ्यांची झालेली अवस्था पाहून आंबेराव फिदीफिदी हसायला लागले.

तेवढ्यात चिंटू आला त्याने आंबेरावांना उचलले आणि बेसीनच्या नळाखाली चांगली रगडून अंघोळ घातली. मग त्याला दाबून-दाबून अगदी पिलपिला करून सोडला. मग बेशुद्ध झालेल्या आंबेरावांचा सगळा रस काढून मिक्सरमध्ये गरागरा फिरवला. बिचारा चक्कर आलेला आंबेराव गुपचुप जाऊन मिल्कशेकमध्ये पडला. मग चिंटूने त्याला घटा-घटा पिऊन टाकले आणि तो बाहेर खेळायला पळून गेला. चिंटू बाहेर जाताच भांड्यात बसलेल्या सर्व फळांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. सगळी मंडळी गर्विष्ठ आब्यांची अवस्था पाहून मनातल्या मनात हसत होती.

**प्रणीता सुदाम नलावडे (स.शि.)**
म.न.पा.प्रा. शाळा, पडेगाव कॉलनी, औरंगाबाद.

# परिस्थितीवर मात

राजू नावाचा अत्यंत हुशार व गुणी मुलगा होता. त्याला एक बहीण व छोटा भाऊ होता. राजू भावंडांत मोठा मुलगा त्यामुळे त्याला परिस्थितीची व जबाबदाराची जाणीव होती. त्याची परिस्थिती अत्यंत हालाखीची होती.

आई व वडील धनिक लोकांच्या शेतात शेतमजुरीचे काम करत होते. राजूही शाळा करून भेटेल ते काम करत असे. कधी वडिलांसोबत शेतात काम करायचा, तर कधी पेपर टाकण्याचे काम करत असे.

राजू शाळेत अत्यंत हुशार होता. प्रत्येक विषयाचा त्याचा अभ्यास छान होता. म्हणून शाळेतील प्रत्येक शिक्षकांचा तो अगदी आवडता विद्यार्थी होता. प्रत्येक स्पर्धेत भाग घ्यायचा व नंबर मिळावायचाच.



शिक्षकांना राजूच्या घरच्या परिस्थितीबद्दल काहीच कल्पना नव्हती, कारण तो कधीच त्याच्या परिस्थितीबद्दल कोणाकडेही बोलत नसे. तसे कोणाला दाखवतसुद्धा नसत. पण उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये जेव्हा शाळेतील शिक्षक सर्व्हे करायला त्याच्या घराकडे गेले तेव्हा शिक्षक अगदी अवाक् झाले. कारण त्यांनी राजूची परिस्थिती अगदी जवळून पाहिली.

घरात अगदी मोजकीच भांडी, मोजकेच कपडे व इतर अत्यावश्यक वस्तू होत्या. त्याचे घर गावापासून अगदी दूर होते. शिक्षकासाठी चहा करण्याची त्याची खूप इच्छा होती. त्याच्या घरात साखरही नव्हती. तो गडबडीत साखर आणायला गेला; परंतु त्याला यायला खूप उशीर होत होता. तेव्हा शिक्षकांनी त्याच्या बहिणीला विचारले, राजू एवढा उशीर का लावत आहे ? तेव्हा त्याच्या बहिणीचे शब्द ऐकून शिक्षकांना खूप

वाईट वाटले. ''ती म्हणाली जवळपास दुकान नाही, तो पळत गावात गेला आहे.'' शिक्षक म्हणाले सायकलवर का नाही गेला तेव्हा बहीण उत्तरली, ''सायकल नाही आमच्याकडे''.

शिक्षकांना त्याचा स्वावलंबीपणा व जिद्दीपणा भावला. घरी आलेल्या शिक्षकांना चहा पाजण्यासाठी तो दूर गावात पळत जाऊन साखर आणायला गेला. बिकट परिस्थिती असून, तिला कवटाळत न बसता तिच्यावर मात करून अभ्यास करत होता. सायकल नसतानाही शाळेत दररोज तसेच वेळेत हजर राहत होता. घरात लाईट नसतानाही रोजचा अभ्यास रोज पूर्ण करत होता आणि प्रत्येक वर्षी पहिला नंबर आणत होता.

**जयश्री विठ्ठल पवार (स.शि.)**
म.न.पा. प्रा. व माध्य.वि. मिटमिटा, औरंगाबाद.

# एका तळ्याच्या काठी



एक सुंदर बाग होती. त्या बागेत एक तलाव होता. त्या तळ्यात काही बेडूक राहत होते. अशाच एका सुंदर सकाळी सोनू व तिचे मित्र खेळण्यासाठी बागेत आले. तळ्यात त्यांना बेडूक उड्या मारताना दिसले. बेडूक पाहून मुलांना खूप मजा वाटली. ते त्यांना पाहू लागले.खेळ म्हणून तळ्याच्या बाजूने पडलेले दगड उचलून ते तळ्यात असलेल्या बेडकावर नेम धरून मारू लागले. पाण्यातील बेडूक खूप घाबरले ते इकडे-तिकडे पळू लागले. त्यातीलच एक बेडूक धीर धरून डोके वर करून मुलांना म्हणाला ''का रे मुलांनो, आम्हाला असे का मारता?'' तुम्हाला खूप मजा येत आहे, पण त्यामुळे माझे मित्र जखमी होत आहेत. नका रे मुलांनो आम्हाला मारू नका,'' बेडकाचे हे बोलणे ऐकून मुलांना आपली चूक कळाली. त्यांनी बेडकांची माफी मागितली आणि म्हणाले, ''यापुढे आम्ही असा कोणताही खेळ खेळणार नाही की ज्यामुळे कोणाला त्रास होईल.''

**अस्मिता भगवान अंभोरे (स.शि.)**

म.न.पा. प्रा.शा. मा.शा. इंदिरानगर बायजीपुरा, औरंगाबाद.

# गोडूची गोष्ट

एका गावात रामू नावाचा शेतकरी राहत राहेता. त्याला दोन मुले होती. लाडू आणि गोडू लाडू मोठा होता तिसरीच्या च्या वर्गात... तर गोडू पहिलीला होता. लाडूला नवनवीन पदार्थ खाण्याची खूप आवड होती. अभ्यासात दोघेही हुशार होते. गोडू शांत असायचा. स्वत:ची सगळी काम स्वत:च करायचा.

एकदा काय झाले ? बाजाराच्या गावी जत्रा भरली होती. तिथे आनंदनगरी आली असल्याची माहिती लाडू आणि गोडूला मिळाली. शाळेतील काही मुले आनंदनगरीला जाऊन आली होती. मग ते वर्गात गप्पा करताना तिथली गंमत सांगत, तिथल्या मौजमजेचे वर्णन करून सांगत असत. लाडू गोडूची उत्सुकता वाढू लागली होती. तिथले रहाटपाळणे, मौत का कुआँ , आगगाडी, घोडागाडी, जादूगार या सगळ्याच गोष्टी मोहिणी करत होत्या. त्यांनासुद्धा खूप वाटत होत की, आपणही आनंदनगरीला जावे. लाडू मनातल्या मनात यादी करीत होता. आपण जर आनंदनगरीत गेलो तर भेळ खाऊ , पाणीपुरी खाऊ , कुल्फी-गारीगार खाऊ असे विचार त्याच्या मनात गर्दी करत होते.



मग ४-५ दिवसांनी धीर एकवटून लाडू बाबांना म्हणाला ''बाबा, आम्हाला आनंदनगरीला जायचंय, घेऊ न चला ना... आमच्या शाळेतील खूप सारी मुलं जाऊन पण आली बाबा हसून म्हणाले, ''बरं, या रविवारी जाऊ आपण...''

दोघांच्याही डोक्यात विचारचक्र सुरू झाले होते. रविवारी काय काय करायचे याचे मनातल्या मनात बेत आखले जात होते. उत्सुकता वाढत होती. शेवटी तो दिवस उजाडला. दोघेही स्वच्छ अंघोळ करून नवीन कपडे घालून आनंदनगरीला जायला निघाले. सोबत वडील होतेच, त्यांनी लाडू आणि गोडू दोघांनाही पन्नास-पन्नास रुपये घरातून निघतानाच देऊन ठेवलेले होते. 'या पैशात तुम्हाला काय करायचे ते करा' असे त्यांनी सांगून ठेवले होते. मुलांनी उड्या मारतच गाव

गाठले. जत्रेत दिसेल ते सगळे पाहत अनुभवत ते निघाले. रंगीबेरंगी फुगे, खेळण्याच्या गाड्या, हरमालाची दुकाने, या सगळ्या गोष्टी ते अनुभवत होते. या जत्रेत आपण कुठे हरवून जाऊ नये म्हणून दोघांनीही वडिलांचा हात घट्ट पकडून ठेवलेला होता. आवडीचे काही दिसले की, दोघेही रेंगाळायचे, पहायचे, विचार करायचे आणि पुढे जायचे, हे ठरलेले. वडिलांना कौतुक वाटलं. ते विचारायचे ''हे घ्यायचे का?'' ''ते घ्यायचे का?'' पण त्यांनी ठरवलेलं होतं तेच ते करणार होते. लाडून ठरवले होते रहाट पाळण्यात बसायचे. तो रोमांच अनुभवायचा. त्याने वडिलांना विचारले आणि तिकीट काढून रहाट पाळण्यात बसला. तेवढ्या वेळात गोडूने आईसाठी पेढ्याचा प्रसाद घेतला, त्यानंतर लाडून भेळ खाल्ली. गोडू त्यासाठी सुद्धा नाही म्हणाला वर्गातल्या सोनूचे भेळ खाल्याने पोट दुखल्याचे त्याला माहित होते. समीरने गारी-गार खाल्ली तर त्याला सर्दी झाली हेही त्यांने लाडूला सांगितले. लहान असूनही गोडू विचारपूर्वक निर्णय घेतोय हे पाहून वडिलांना कौतुक वाटले. परत निघताना गोडूला एका ठिकाणी आंबे विकणारी बाई दिसली.वडिलांच्या मदतीने त्याने चांगले आंबे निवडून घेतले आणि घरी निघाले. वडिलांना हवे ते निरीक्षण ते करत होते. लाडू आणि गोडू खुशी-खुशीत घराकडे निघाले. खूप दिवसांपासून ज्या गोष्टींची आतुरतेने वाट पाहत होतो ती गोष्ट पूर्ण झाली होती. दोघेही उड्या मारतच घरात शिरले. आईला सगळी गंमत सांगू लागले. आईने आमरस केला. गोडूने आब्यांच्या कोयी उन्हात वाळवून त्या शेतात लावण्याचे आधीच ठरवले होते. त्याने तसेच केले लाडू, जत्रेत काय केले ते रंगवून रंगवून मित्रांना सांगता होता. वडील मात्र समाधानाने गोडूकडे पाहत होते. आंब्याची झाडे जसजशी मोठी होत होती गोडूही तसतसा अधिकाधिक समंजस होत चालला होता.

**विद्युल्लता पवार - गोरे**

म.न.पा. केंद्र प्रा. व मा.वि. इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद.

# आरसा

बहीण आणि भाऊ  हे लहानपणी प्रेमाने भांडत असतात आणि आई-बाबांकडे तक्रारी करत असतात. एका भावाला आपल्या देखणेपणाबद्दल गर्व होता. तो सारखा आरशात पाहत राही व भांग पाडून नट्टापट्टा करी. बहीण सावळी होती. त्यामुळे ती फार कमी वेळा आरसा पाही. बहिणीच्या सावळेपणाबद्दल व नकट्या नाकाबद्दल भाऊ चिडवू लागला. बहीण रडत बाबांकडे गेली व म्हणाली,''बाबा, बघा ना हा दादा, उगाच मला सारखा चिडवत असतो. मी मुलगी असून, सुंदर नाही म्हणतो, आणि आरसा लपवून ठेवतो.''

वडिलांनी मुलाला जवळ बोलावून घेतले व त्याला समजावले की, अरे तू मुलगा ना? मग मुलींसारखा सारखा आरशात पाहून नट्टापट्टा का करतोस? तर मुलींचे काम, तू तुझे काहीतरी कर्तृत्व करून दाखव, म्हणजे चेहऱ्याच्या चमकेपेक्षा बुद्धीची चमक दिसेल.'' मुलगा खजील झाला. त्याने लपवलेला आरसा बहिणीला दिला.

मग बाबा आपल्या मुलीला म्हणाले, 'तू मुलगी आहेस, म्हणून काही तू स्वत:कडे कमीपणा घेऊ  नकोस, आपला सावळेपणा, नकटे नाक याकडे लक्ष न देता, तू लोकांशी चांगले वाग, खूप शीक म्हणजे तुझे रूप साधारण आहे. याकडे कुणाचेच लक्ष जाणार नाही.



बहीण भावाला बाबांचे म्हणजे पटले होते त्या दिवसांपासून त्या घरात दंगा कमी आणि अभ्यास जास्त होऊ  लागला. अन् भिंतीवरचा आरसा आनंदाने हसू लागला.

**चव्हाण व्ही.ए.(स.शि.)**
मनपा. के.प्रा.शा.सिडको, एन-१२, औरंगाबाद.

# हुतात्मा

बाईंनी कथेला सुरुवात केली

''कर चले हम फिदा, जाने तन साथियों...

''जब तक सुरज चाँद रहेगा

कौस्तुभ तेरा नाम रहेगा ।।

'वंदे मातरम्' या अशा अनेक घोषणांनी परिसर दुमदुमत होता. रस्त्यावर अलोट गर्दी होती. गर्दीतून मुसमुसण्याचे हुंदक्यांचे आवाज येत होते. गर्दीतले सगळेच चेहरे उदास होते.



भयाण शांतता त्या जनसमुदायात होती. सारे जण चालत होते, आपल्या शूरवीर पुत्रासोबत अखेरचं !

मुलांनो, ही कथा आहे भारतमातेची सेवा करता करता सीमेवर शहीद झालेल्या मेजर कौस्तुभ राणे यांची या शहीद जवानाची ही अंतिम यात्रा होती. प्रश्न पडतो याला अंतिम यात्रा तरी कसं म्हणावं? ही तर शहीद यात्रा होती. मुलांनो, आपल्या भारताच्या सीमेवर आज कित्येक लष्करी जवान, अधिकारी अहोरात्र पहारा देत या भारतभूचं रक्षणं करत आहेत.

'' सोडिले सर्व घरदार, सोडिला सुखी संसार

ज्योतीसम जीवन जगले, ते अमर हुतात्मे झाले ।।''

हे गीत आपण म्हणतो, याप्रमाणेच या जवानांच्या जीवनगाथा आहेत. अशाच आपल्या तरूण, तडफदार, कर्तव्यदक्ष मेजर कौस्तुभला आणि त्याच्या चार जवानांना कर्तव्य बजावतांना ७ ऑगस्ट रोजी वीरमरण आलं. कौस्तुभच्या गावी ही अंत्ययात्रा चालू होती. त्या गर्दीत मुकपणानं चालणारी, ज्यांचं सर्वस्व हरवलं आहे अशा व्यक्ती होत्या. त्यांचा प्रत्येक अश्रू हा कौस्तुभची वीरमाता, वीरपत्नी, वीरपुत्र वीर भगिनी ! मुलांनो, या सुखी कुटुंबाने त्यांच सुखचं गमावलं होतं. ते रडत होतं पण त्यांच्या रडण्यामागे सार्थ अभिमान होता की,

आम्ही आमचा एकुलता एक पुत्र भारतमातेला दिला. तिरंग्यात लपेटलेला कौस्तुभचा देह सारे कुटुंबीय वारंवार बघत होते. आणि आज सर्वजण त्याला पुष्पचक्र अर्पण करत होते. पुष्पचक्राच्या प्रत्येक फुलात जणू भारतमातेचा श्वासच होता.

प्रखर देशभक्ती, त्याग, निष्ठा, कुटुंबवत्सलता, सहिष्णुता या गुणांनी हा देह सजला होता. अंतिम टप्प्यात ही यात्रा पोहचली. मेजरला अखेरचा निरोप देण्याची सरकारी इतमामाने सारी तयारी केली होती.

अखेरची श्रद्धांजली सारे जण वाहत होते. आई,वडील, पत्नी यांनी अखेरचं डोळे भरून पाहिलं, शेवटी बहिणीने आपल्या भावाच्या निश्चल देहावर जेव्हा राखी व त्याला आवडणारं चॉकलेट समर्पित केलं तो क्षण साऱ्यांना हेलावून आणि रडवून गेला. तिला तिचा हा लाडका भाऊ परत कधीच भेटणार नव्हता. त्या छोट्या लेकराला आपल्या बाबाला काय झालंय हेही कळत नव्हतं. तो सैरभैर होता.

करुण स्वरात चाललेली कथा मुलं फार भावूकतेने ऐकत होते. बाई पुढे सांगू लागल्या.

''मुलांनो, ही सत्य घटना घराघरांतून बघत होते. सगळे लोक बसल्या जागी मनोमन रडतही होते.''

शेवटच्या क्षणी कौस्तुभच्या देहाला लपेटलेला तिरंगा काढला गेला. मुलांनो, तिरंगा का काढला माहितंय का? नाही नं ऐका मग, तिरंगा हा भारताची शान आहे. त्याला जाळणे, फाडणे, विस्कटून टाकणे म्हणजे त्याचा अपमान आहे. विविध शौर्याच्या प्रसंगी त्याचा सन्मान केला जातो. देहाला लपेटलेला तिरंगा म्हणजे त्या जवानाच्या भारतमातेने, राष्ट्राने केलेला गौरव असतो. म्हणून तो जाळत नाहीत, किंवा दफन ही करत नाहीत. देहावरचा तिरंगा काढला, तो सन्मानाने वीर पत्नीला बहाला केला तिरंगा छातीशी कवटाळून त्या वीरपत्नीचा बांध सुटला. डोळे अविश्रांत वाहू लागले. संयमाने त्या धीरोदत्त पत्नीने पतीला अखेरचा निरोप दिला.

वडिलांनी अग्नी दिला आणि देशभक्तीचा देह अनंतात विलीन झाला. गर्दीतल्या हुंदक्याचा आवाज पुन्हा वाढला. मुलांनो, देह संपतो पण स्मृती कायम राहतात. देश त्याला कधीच विसरणार नाही. कारण अशाच रक्तरंजित शौर्याचा इतिहास आपल्या देशाला आहे. तो आपण विसरलो का?

''नाही मॅडम'' एका आवाजत मुलं म्हणाली, उलट या जवानांच्या कुटुंबाचा आपल्या भारतीयांना अभिमानच वाटतो आहे. आज महाराष्ट्रातील अनेक घरातील जवान सीमेवर लढत आहेत. आणि आपल्या संपन्न देशाला सुरक्षित ठेवण्यासाठी खूप जवानांची गरज आहे. कौस्तुभ राणे आणि आजवर शहीद झालेल्या सैनिकांना डोळ्यांसमोर ठेवून 'मी सैन्यदलात जाणार ' अशी प्रतिज्ञा तरुणपिढींनी केली पाहिजे. प्रत्येक भारतीयांच्या मनात देशप्रेमाची चेतना चिरंतन ठेवण्यासाठी या सर्व क्रांतिकारकांना कायम लक्षात ठेवणे हे आपले कर्तव्य आहे.

मुलांनो, कथेच्या शेवटी भारतमातेच्या साऱ्या सुपुत्रांना त्रिवार वंदन करूया आणि शहिदांना श्रद्धांजली वाहूया

वंदेमातरम् ।।

कथा ऐकतांना मुलं भारावून गेली होती. कथा संपताच मुलं भानावर आली

''बाई, खूपच आवडली ही गोष्ट '' मुलं म्हणाली

**अर्चना अनिल जोशी (स.शि.)**
म.न.पा. प्रा.व मा.वि. राहुलनगर, बनेवाडी, औरंगाबाद.

# छान किती दिसते फुलपाखरू

वर्गातल्या शेवटच्या तासाला शिक्षिका कथा सांगत होत्या

खूप दिवसानंतर बागेत आल्यामुळे परीराणी आज खूप खूश होती. सगळ्या झाडांशी, फुलांशी, पानांशी बोलत बोलत ती पुढे पुढे जात होती. तिचा पांढराशुभ्र पंखांचा घेर सर्वांना गोंजारत होता. न उमललेल्या कळ्यांना ती प्रेमाने फुंकर घालत होती. परीराणी सर्वांचीच फार आवडती असल्यामुळे सारेचजण तिच्याभोवती फिरत होत. खूप वेळ असाच मजेत गेला अन् परीराणी एकदमच सैरभैर झाली. ती कुणालातरी शोधू लागली. न राहवून तिने एका मोठ्या फुलाला विचारले. ''का रे, मला आज माझे अजून काही मित्र भेटत का नाहीत?'' ''कोण ग?'' फुलाने विचारले. परी लगेच म्हणाली. ''अरे, फुलपाखरं आणि पाकोळ्या रे।'' फूल म्हणाले ''अरेच्या ते होय ! अगं तू येणार म्हणून ते लांब एका झाडावर रूसून बसले आहेत.''



''हो का?'' का बरं ? मी काय केलं असं?'' परीला वाईट वाटलं. ''थांबा, मी जातेच त्यांच्याकडे !'' असं म्हणत परी भराभर चालत त्यांच्याकडे गेली. तिने दुरूनच पाहिले. सगळी फुलपाखरे. पाकोळ्या एकाच झाडावर दाटीवाटीने बसल्या आहेत. त्यांनी परीला येताना पाहिले अन् अजूनच तोंड फिरवले.

परी जवळ गेली आणि म्हणाली ''हाय माझ्या मित्रांनो, मी आले.'' सगळ्यांनी ते ऐकलं पण कोणीच तिच्याकडे बघेना परी अजून जवळ गेली. आणि म्हणाली ''अरे बापरे, फारच रूसलेत सगळे माझ्यावर .'' काय करू बरं मी आता? अरे माझ्याशी बोला, खेळा.'' असं ती म्हणू लागली तरी काहीच नाही. मग मात्र ती खूप रडवेली झाली. रडणार एवढ्यात एक मोठं फुलपाखरू उडत येऊन तिच्या पंखावर बसलं. परीनं टुणकन् उडी मारली, ''गेला का रूसवा''? असं विचारताच ते म्हणालं, ''नाही, नाही, तू आमचा एक निरोप देवाला देणार

असशील तरच आम्ही बोलतो तुझ्याशी. परीने क्षणभर विचार केला आणि म्हणाला, ''एकदम मान्य! ''सांगा काय काम आहे'' मी सांगेन हं देवाला'' एक छोटी पाकळी म्हणाली, ''तू देवदूत आहेस ना?'' ''हो हो'' परी म्हणाली

आता हळू हळू सगळेच बोलू लागले. ''अगं परीराणी आम्ही या बागेत राहतो आमच्या अवतीभोवती सुंदर आणि रंगीत फुले आहेत. त्यांना बघून आम्हाला आमच्या एकाच रंगाची खूप लाज वाटते आणि वाईटही वाटत. खूप छान दिसावं आम्ही! अशी आमची इच्छा आहे.'' एक छोटं फुलपाखरू हिरमुसून म्हणालं. ''ही सारी फुलं आम्हाला चिडवतातसुद्धा तू देवाला विचार'' ''का नाही दिले आम्हाला छान छान रंग?'' किती छान दिसू आम्ही वेगवेगळे रंग दिले तर ! आमचे आकार छान आहेत पण रंग मात्र एकचं ! शी ! कंटाळा आला आम्हाला या काळ्या पांढऱ्या रंगाचा !

परी सगळ्यांची तक्रार ऐकत होती. तिला खूप मजा वाटली. ती म्हणाली. ''हा रुसवा आणि राग आहे तर !'' बरं, जाते मी देवाकडे आणि सांगते संगळं. बघू या देव काय करतो ते ! फुलपाखरे, पाकोळ्या सारे एकदम खूश झाले, आहे तो रंग घेऊन उडू लागले आणि मजेत म्हणू लागले

''परी गं परी जा ना देवाच्या घरी

देवाघरी जाऊन तू घेऊन ये रंग

रंगाच्या जगात होऊ आम्ही दंग

वेगवेगळ्या रंगात खुश होऊ सारी

परी गं परी, परी गं परी,

आमच्यासोबत खेळतील पाने, फुले

भिरभिरू आम्ही, खूश होतील मुले

हासत नाचत येतील आमच्या दारी

परी ग परी.

परी फुलपाखरांचा निरोप घेऊन देवाकडे गेली. देवाला सांगितले ''देवा,

पृथ्वीतलावरची फुलपाखरं फार नाराज आहेत. तुम्ही त्यांना फुलांसारखे वेगवेगळे रंग द्यावेत असं त्यांना वाटतं. ''देव म्हणाला,''एवढं छोट कामं?'' चला माझ्यासोबत'' देवाला घेऊन परी पुन्हा बागेत आली ''मित्रांनो! या! रे बघा कोण आलयं तुमच्याकडे चेहऱ्यावर फार नाराजी होती देव बोलू लागला. ''माझ्याकडे बघा सगळे, तुमचा निरोप मला मिळाला माझ्यावर रागावलात का तुम्ही'' अरे , तुम्हाला रंग हवेत ना ! मग यायचं माझ्याकडे उडत, माझ्याकडे रंगाचा खूप साठा आहे. देऊ तुम्हाला रंग?'' आनंदी चेहऱ्यांनी सर्वांनीच माना डोलावल्या देव म्हणाला ''चला या माझ्याजवळ'' उडत उडत सगळेच परी आणि देवाच्या भोवती जमा झाले. देवाने आणि परीने सगळ्यांच्या अंगावरून जादूची कांडी फिरवली बघता बघता हळूहळू त्यांचा काळा पांढरा रंग जाऊन त्याजागी वेगवेगळे रंग दिसू लागले ''वा ! छान ! सुंदर ! अप्रतिम !'' असं ते एकमेकांकडे बघून म्हणू लागले. देवाच्या भोवती फेर धरून सर्वजण नाचू लागले. सगळे फुलंपण त्यांच्यासोबत खेळू लागले.

रंगीत फुलं, रंगीत झाडे, रंगीत पाकोळ्या, रंगीत फुलपाखरे यामुळे बाग प्रसन्न दिसू लागली. सगळेच एकमेकांना कुतुहलाने पाहू लागले. रंगीत रंगीत हातांनी सगळ्यांनी फेर धरला आणि आनंदानं सगळेच गाऊ लागले.

१) देवा तुझे आम्ही

२) मानू कसे आभार

३) सुंदर आमचा रंग

४) सुंदर आमचा आकार !

५) फुलांशी मैत्री करून

६) खाऊ आम्ही मकरंद

७) इकडून तिकडे उडताना

८) देऊ सर्वांना आनंद !!

देवाने सर्वांना रंग दिले, खुश झालेली फुलपाखरे

तेव्हापासून साऱ्यांनाच आनंद देत आहेत.

आपण कविता म्हणू , ‘‘छान किती दिसते फुलपाखरू’’

बाईंनी गोष्ट संपवली तरी मुलं फुलपाखरातच रमली होती.

**अर्चना अनिल जोशी (स.शि.)**
म.न.पा. प्रा. व मा. वि., राहुलनगर, बनेवाडी, औरंगाबाद.

# माझ्या स्वप्नातील औरंगाबाद शहर





# मूठभर गोष्टी

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**

**समग्र शिक्षा अभियान-शिक्षण विभाग**